# उमेदवारांना विशेष सूचना

## पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

***- पोलीस शिपाई भरती २०१७ -***

पोलीस आयुक्त ठाणे शहर आस्थापनेवरील पोलीस शिपायांची २७३ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक २४/०२/२०१७ रोजी पासून पोलीस भरती सन २०१७ ची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून त्यामध्ये उमेदवारांकडून ऑनलाईन आवेदन अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकः १७/०३/२०१७ ऐवजी दिनांकः २०/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच उमेदवारांनी प्राप्त केलेली कागदपत्रे ही दिनांकः १७/०३/२०१७ ऐवजी दिनांकः २०/०३/२०१७ पर्यंतची ग्राहय धरली जाणार आहेत.

उन्हाळयाची तीव्रता टाळण्यासाठी दिनांकः २२/०३/२०१७ रोजी पासून प्रत्यक्ष पोलीस भरती प्रक्रियेमध्ये शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी सुरु करण्यात येणार असल्याने संगणकीय प्रणालीद्वारे आवेदन अर्ज सादर करण्यासाठी दिनांकः २०/०३/२०१७ नंतर वाढीव मुदतवाढ देण्यात येणार नाही. यास्तव जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेल्या सर्व पात्र उमेदवारांनी याची नोंद घेऊन मुदत संपण्यापूर्वी संगणकीय प्रणालीद्वारे मुदतीत त्यांचे आवेदन अर्ज भरण्याची दक्षता घ्यावी.

ठाणे पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर खुल्या प्रवर्गातील, तसेच अनुसुचित जमाती, विजा-अ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), या प्रवर्गातील जागा रिक्त नसल्याने, या प्रवर्गातील उमेदवारांनी पोलीस भरती सन २०१७ करिता पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांचेकडे आवेदन अर्ज करु नयेत.

15.3.17

**( मकरंद रानडे )**
**अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),**
**तथा पोलीस भरती अध्यक्ष सन २०१७**
**पोलीस आयुक्त,कार्यालय ठाणे शहर**